क्रमांक:-एमआयएस-०६१६/सीआर-९०/२०१६/तीन

**विषय:-विकलांग व्यक्तींना लेखनिक पुरविण्याबाबत तसेच अनुग्रह [Compensatory] कालावधीबाबत मार्गदर्शक सूचना:-**

विकलांग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५ मधील तरतुदीनुसार दृष्टीहीन, अल्पदृष्टी, सेरेब्रल पाल्सी आणि डिस्लेक्सियाने बाधित उमेदवार **लिहिण्यासाठी सक्षम नसल्यास** परीक्षा प्रयोजनार्थ त्यांच्या मागणीप्रमाणे परीक्षेच्या वेळी लेखनिक व अनुग्रह कालावधीची सुविधा पुरविण्यात येते.

**२.** महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित परीक्षा या शासनसेवेतील उच्च पदावरील निवडीसाठी घेण्यात येणा-या स्पर्धा परीक्षा आहेत. स्पर्धा परीक्षेमध्ये उमेदवारांच्या स्वत:च्या बौध्दिक क्षमतेची तपासणी महत्वाची असते. परीक्षेमधील उमेदवाराच्या कामगिरीवर [Performance] उमेदवाराची संबंधित पदावरील निवडीकरीता योग्यता ठरते. प्रत्यक्ष परीक्षेच्या वेळी एखाद्या उमेदवाराला कोणत्याही प्रकारे अवाजवी लाभ प्राप्त झाला तर १-२ गुणांच्या फरकामुळे सुध्दा संबंधित व अन्य उमेदवारांच्या गुणवत्ता यादीमधील स्थानावर व निवडीवर फरक पडू शकतो. आयोगामार्फत आयोजित परीक्षेच्या वेळी विकलांग उमेदवारांना , **ते लिहिण्यासाठी सक्षम नसल्यास** परीक्षा प्रयोजनार्थ लेखनिक व अन्य सोयी सुविधा पुरविताना उद्भवणा-या अडचणी, सोयी सुविधा पुरविताना फक्त नियमानुसार पात्र व गरजू उमेदवारांनाच सोयी सुविधा मिळणे आवश्यक असल्याची बाब तसेच सोयीसुविधा पुरविताना त्याचा कोणत्याही टप्प्यावर/स्तरावर अवाजवी फायदा घेतला जाऊ नये, गैरवापर होऊ नये यादृष्टीने करावयाची व्यवस्था, यासंदर्भात प्राप्त होणा-या तक्रारी, इत्यादी बाबी लक्षात घेऊन, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित सर्व परीक्षांच्या वेळी विकलांग व्यक्तींना लेखनिक पुरविण्याबाबत तसेच अनुग्रह कालावधी अनुज्ञेय ठरविण्याबाबत **खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना विहित करण्यात येत आहेत:-**

**२.१** **फक्त दृष्टीहीन, अल्पदृष्टी, अस्थिव्यंग, सेरेब्रल पाल्सी आणि डिस्लेक्सियाने बाधित उमेदवार, लिहिण्यासाठी सक्षम नसल्यास** परीक्षा प्रयोजनार्थ त्यांच्या मागणीप्रमाणे लेखनिक तसेच अनुग्रह कालावधी [Compensatory Time] व अन्य बाबीं संदर्भात व्यवस्था करण्यात येईल.

**२.२** परीक्षेच्या वेळी लेखनिक उपलब्ध करुन देण्याबाबत आणि/अथवा अनुग्रह कालावधीच्या परवानगीबाबत सोबतच्या विहित नमुन्याद्वारे **(प्रपत्र-१)** संबधित जाहिरातीस अनुसरुन आयोगास अर्ज सादर केल्याच्या दिनांकापासून ७ दिवसांच्या आत आयोगाकडे स्पष्ट मागणी करणे आवश्यक आहे.

**२.३** लेखनिकाची व्यवस्था उमेदवाराकडून स्वत: केली जाणार आहे, की आयोगामार्फत लेखनिकाची व्यवस्था करावी लागणार आहे, याचा जाहिरातीस अनुसरुन **ऑनलाईन** पध्दतीने केलेल्या **अर्जामध्ये स्पष्ट उल्लेख असल्यासच** विहित नमुन्याद्वारे **(प्रपत्र-१)** प्राप्त लेखी विनंतीचा विचार करण्यात येईल.

**२.४** ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जामध्ये मागणी केली नसल्यास व आयोगाची विहित पध्दतीने पूर्व परवानगी घेतली नसल्यास, ऐनवेळी लेखनिकाची मदत घेता येणार नाही अथवा अनुग्रह कालावधी अनुज्ञेय ठरणार नाही.

**२.५** किमान ४०% विकलांगत्व असलेल्या, तसेच लिहिण्यासाठी कायमस्वरुपी वेगावर मर्यादा असल्याबाबत (Physical limitation to write including that of speed) शासन पत्र, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रवि-२०१७/प्र.क्र१९६/आरोग्य-६, दिनांक १३ ऑक्टोबर, २०१७अन्वये **विहित करण्यात आलेले सोबतच्या नमुन्यातील प्रमाणपत्र (प्रपत्र-२) सादर करणा-या उमेदवारांनाच** लेखनिकाची सेवा अथवा अनुग्रह कालावधी देण्याबाबत आयोगाकडून विचार करण्यात येईल.

**२.६** लिहिण्यासाठीच्या वेगावर शारीरिक मर्यादा असल्याबाबतचे प्रमाणपत्र (प्रपत्र-२) उमेदवार ज्या जिल्ह्यातील सर्वसाधारण रहिवासी आहे; त्या जिल्ह्यातील **सक्षम वैद्यकीय मंडळाकडून** जारी करण्यात आलेले असणे आवश्यक आहे.

**२.७** लिहिण्यासाठीच्या वेगावर शारीरिक मर्यादा असल्याबाबतचे प्रमाणपत्र (प्रपत्र-२) उमेदवाराच्या विकलांगत्वाच्या प्रमाणपत्रा व्यतिरिक्त असणे आवश्यक आहे.

**२.८** लिहिण्यासाठीच्या वेगावर शारीरिक मर्यादा असण्याबाबतचे सक्षम वैद्यकीय मंडळाने प्रदान केलेले प्रमाणपत्र (प्रपत्र-२) **परीक्षेच्या दिनांकापूर्वीचे असणे** बंधनकारक आहे.

**२.९** लेखनिकाची व्यवस्था त्या उमेदवाराने स्वत: केली असल्यास व ऐनवेळी सदर लेखनिक अनुपस्थित राहिल्यास त्याची जबाबदारी पूर्णत: उमेदवारावर राहील.

२.१० काही अपवादात्मक परिस्थितीत परीक्षा सुरु होण्याच्या ऐनवेळी लेखनिक बदलास मान्यता देण्याचे अधिकार संबंधित उपकेंद्रप्रमुखांना राहतील.

२.११ उमेदवाराने स्वत: लेखनिकाची व्यवस्था केल्यास त्याच्या मानधनाची व्यवस्था उमेदवारास करावी लागेल.

२.१२लेखनिक आयोगामार्फत/जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत पुरविण्यात आला असल्यास आयोगाने विहित केल्याप्रमाणे लेखनिकाचे मानधन संबंधित उपकेंद्रप्रमुखांकडे परीक्षा सुरु होण्यापूर्वी जमा करणे आवश्यक राहील. लेखनिकाने परीक्षा सुरु होण्याच्या वेळेपूर्वी किमान एक तास अगोदर परीक्षा केंद्रावर उपस्थित राहून मानधन व नियुक्ती-पत्र उपकेंद्रप्रमुखांच्या स्वाधीन करावे.

२.१३ परीक्षेच्या वेळी उमेदवार तसेच लेखनिक यांनी विहित नमुन्यात (**विवरणपत्र-३**) लेखनिकाच्या फोटोसह संयुक्त हमीपत्र/ घोषणापत्र देणे आवश्यक आहे.

२.१४ विहित नमुन्यात संपूर्ण भरलेले हमीपत्र/घोषणापत्र उमेदवाराने परीक्षेच्या वेळी सोबत आणणे तसेच, परीक्षा सुरु होण्याच्या पूर्वी समवेक्षक व उपकेंद्रप्रमुखांस तपासणीसाठी सादर करणे अनिवार्य राहील. त्याशिवाय लेखनिकाची व्यवस्था अनुज्ञेय ठरणार नाही.

२.१५उमेदवाराने स्वत: व्यवस्था केलेल्या लेखनिकाच्या गैरवर्तनाची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. लेखनिक व उमेदवार यांच्यामधील संभाषणामुळे परीक्षेची शांतता कोणत्याही प्रकारे भंग होणार नाही अथवा इतर उमेदवारांची एकाग्रता भंग होणार नाही, याची दक्षता घेण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

२.१६ उमेदवार व लेखनिक यांना आयोगाच्या परीक्षांचे सर्व नियम/सूचना जशाच्या तशा लागू असतील.

२.१७ आयोगाच्या कार्यालयाकडून अथवा परीक्षेच्या वेळी संबंधित पर्यवेक्षकीय अधिकारी / कर्मचारी यांच्याकडून देण्यात आलेल्या सूचनांचे उल्लंघन केल्यास उमेदवार व लेखनिकावरील इतर कायदेशीर कारवाईसह संबंधित उमेदवाराची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

२.१८ लेखनिकाने स्वत: प्रश्नपत्रिका सोडवू नये अथवा उमेदवारास कोणत्याही प्रकारे मार्गदर्शन वा सूचना करु नयेत. उमेदवाराकडून तोंडी सुचविण्यात येणारे उत्तर लेखनिकाने नमूद करणे एवढेच आवश्यक राहील.

२.१९ लेखनिकाने परीक्षा कालावधीत प्रश्नोत्तराबाबत अथवा इतर कोणत्याही विषयी उमेदवारांशी चर्चा/गप्पा करु नयेत. तसेच, इतर लेखनिक/उमेदवार यांच्याशी बोलू नये.

२.२० उमेदवार व लेखनिक कोणत्याही एकाच परीक्षेकरीता सामाईक उमेदवार असणार नाहीत. सदर बाब कोणत्याही टप्प्यावर निदर्शनास आल्यास उमेदवार व लेखनिक अशा दोघांची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

२.२१ लेखनिक म्हणून एखाद्या उमेदवाराला मदत केलेली व्यक्ती दुस-या उमेदवाराला लेखनिक म्हणून काम पाहू शकणार नाही. (आयोगाने लेखनिकाची व्यवस्था केल्यास अशा लेखनिकावर हे बंधन राहणार नाही)

२.२२ व्यावसायिक लेखनिकाची मदत घेता येणार नाही.

२.२३ आयोगामार्फत एखाद्या पदावर निवड झालेली व्यक्ती दुस-या उमेदवाराला लेखनिक म्हणून काम पाहू शकणार नाही.

२.२४फक्त आयोगाच्या कार्यालयाकडून लेखी परवानगी प्राप्त झालेल्या उमेदवारांनाच लेखनिकाची मदत घेता येईल अथवा अनुग्रह कालावधी देय असल्यास अनज्ञेय राहील.

**२.२५अनुग्रह कालावधी:-**

२.२५.१फक्त दृष्टीहीन, अल्पदृष्टी, अस्थिव्यंग, सेरेब्रल पाल्सी आणि डिस्लेक्सियाने बाधित उमेदवार यांनाच अनुग्रह कालावधी अनुज्ञेय राहील.

२.२५.२सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले विहित नमुन्यातील वैद्यकीय प्रमाणपत्र (**प्रपत्र-२**)परीक्षेचे वेळी सादर करणा-या उमेदवारांनाच अनुग्रह कालावधीची परवानगी खालील अटीवर देण्यात येईल:-

(१) लिहिण्यासाठीच्या वेगावर शारीरिक मर्यादा असल्याबाबतचे सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले विहित नमुन्यातील प्रमाणपत्र सादर करणा-या अथवा लेखनिकाची मदत घेण्यासाठी आयोगाने परवानगी दिलेल्या उमेदवारांनाच अनुग्रह कालावधी अनुज्ञेय राहील.

(२) लेखी परीक्षा एक तासाची असल्यास त्यासाठी २० मिनिटे अतिरिक्त वेळ देण्यात येईल.

(३) परीक्षेचा कालावधी एक तासापेक्षा अधिक असल्यास प्रत्येक तासाला २० मिनिटे याप्रमाणे अतिरिक्त वेळ देण्यात येईल.

(४) लिहिण्यासाठीच्या वेगावर शारीरिक मर्यादा असल्याचे विहित प्रमाणपत्र सादर करणा-या उमेदवाराने लेखनिकाची मदत घेतली नसेल तरीही त्यास प्रत्येक तासाला २० मिनिटे अनुग्रह वेळ अनुज्ञेय आहे.

(५) अनुग्रह कालावधीची मागणी करणा-या उमेदवाराने विहित नमुन्यात (**विवरणपत्र-४**) प्रमाणपत्र परीक्षेच्या वेळी सोबत आणणे तसेच परीक्षा सुरु होण्याच्या पूर्वी समवेक्षक व उप केंद्रप्रमुखास तपासणीसाठी सादर करणे अनिवार्य राहील.

**२.२६**निवड प्रक्रिया अथवा मुलाखत अथवा निवडीनंतर कामावर रुजू होताना अथवा अन्य कोणत्याही टप्प्यावर, विकलांगत्वामुळे लिहिण्याच्या वेगावर मर्यादा येत असल्यामुळे परीक्षेच्या वेळी लेखनिकाची सेवा घेणे आवश्यक असल्याबाबत सक्षम प्राधिका-याने नियुक्त केलेल्या वैद्यकीय मंडळाची खात्री पटविण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.

**२.२७** लेखनिकाची मदत घेण्याबाबत अथवा अनुग्रह वेळ घेण्याबाबत विहित निकषाची उमेदवारांकडून पुर्तता होत नसल्याचे अथवा उमेदवाराने स्वत: बद्दल तसेच लेखनिकाबद्दल दिलेली माहिती चुकीची/खोटी असल्याचे अथवा उमेदवारांकडून अथवा लेखनिकाकडून कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे कोणत्याही टप्प्यावर निदर्शनास आल्यास, संबंधित उमेदवाराची परीक्षेची उमेदवारी रद्द करुन उमेदवारास व लेखनिकास आयोगाच्या स्वेच्छाधिकारानुसार आयोगामार्फत आयोजित केल्या जाणा-या परीक्षांमधून प्रतिरोधित करण्यात येईल व अथवा इतरही कायदेशीर कारवाई करण्यात येईल. अशा प्रकरणी उमेदवाराची शासन सेवेतील पदावर नियुक्ती झाली असेल तर त्याची सेवा समाप्ती करण्यास तो पात्र राहील.

**३.** सदर मार्गदर्शक सूचना आयोगामार्फत यापुढे आयोजित करण्यात येणा-या सर्व परीक्षांकरीता लागू होतील.

दिनांक:-२८ फेब्रुवारी, २०१८

सुनिल अवताडे
उपसचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई

**प्रपत्र-१**

विकलांग व्यक्तीसाठी लेखनिक व/किंवा अनुग्रह कालावधी मिळण्याबाबत विनंती अर्ज

प्रेषक:
नाव.........................................
पत्ता...............................................
...................................................
दिनांक:........../........../२०......

प्रति,

मा. सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
बँक ऑफ इंडिया इमारत,
तिसरा मजला, महात्मा गांधी मार्ग,
हुतात्मा चौक, मुंबई-१.

**विषय:-विकलांग व्यक्तींना परीक्षेच्या वेळी लेखनिक व/किंवा अनुग्रह कालावधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

महोदय,

मी विकलांग उमेदवार असून आयोगामार्फत दिनांक..........................रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरुन आयोगास अर्ज सादर केला आहे. सदर परीक्षेच्या उमेदवारीसंदर्भातील माझी माहिती खालीलप्रमाणे आहे:-

(१) परीक्षेचे नाव:-``````````````````````````````````````````````````````````````````````````````````

(२) परीक्षेचा प्रस्तावित दिनांक:-......../........./२०.....

(३) नोंदणी क्रमांक:-.....................................................................

(४)आयोगाकडील नोंदणीकृत भ्रमणध्वनी क्रमांक:-.......................................

(५)आयोगाकडील नोंदणीकृत ईमेल आयडी:-.........................................................................................

**२.** मी दृष्टीहीन/अल्पदृष्टी/अस्थिव्यंग/सेरेब्रल पाल्सी/डिस्लेक्सियाने बाधित (लागू नसेल ते खोडावे) विकलांग व्यक्ती असून **परीक्षेच्या वेळी स्वत: उत्तरे लिहिण्यासाठी मी सक्षम नाही**. विकलांग उमेदवारांना लेखनिक पुरविण्यासंदर्भातील शासनाच्या तसेच आयोगाच्या नियम/सूचनानुसार मला लेखनिकाची/अनुग्रह कालावधीची (लागू नसेल ते खोडावे) आवश्यकता आहे.

**३.** विहित विकलांगत्वाबाबत सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेल्या वैध प्रमाणपत्राची प्रत सोबत जोडली आहे.

**४.** विकलांगत्वामुळे स्वत: उत्तरे लिहिण्यासाठी सक्षम नसल्याने/उत्तरे लिहिण्याच्या वेगावर मर्यादा येत असल्यामुळे, परीक्षेच्या वेळी लेखनिकाची सेवा घेणे आवश्यक असल्याबाबत/ नियमानुसार अनुग्रह कालावधी आवश्यक असल्याबाबत (लागू नसेल ते खोडावे) सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेल्या वैध प्रमाणपत्राची प्रत सोबत जोडली आहे.

**#५.**प्रस्तुत परीक्षेकरीता मला आयोगाच्या/जिल्हाधिकारी कार्यालयाकडून लेखनिक उपलब्ध करुन देण्यात यावा **अथवा**

**#६.**प्रस्तुत परीक्षेकरीता लेखनिकाची व्यवस्था मी स्वत: करणार असून लेखनिक म्हणून मी निवडलेल्या व्यक्तीचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

**६.१** लेखनिकाचे नाव -````````````````````````````````````````````````````````````````````````

**६.२** लेखनिकाचा जन्मदिनांक - ....... /......./................ **६.३** लेखनिकाचे जन्मठिकाण:-`````````````````````````

**६.४** लेखनिकाचा कायम रहिवासाचा पत्ता -`````````````````````````````````````````````````````
`````````````````````````````````````````````````````

**६.५** लेखनिकाचा ओळखपत्र क्रमांक-....................................... **६.६** लेखनिकाचा आधार क्रमांक:....................................
(आधार कार्ड, पॅन कार्ड, स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसन्स, मतदान ओळखपत्र, पासपोर्ट यापैकी एक)

**६.७** मोबाईल नंबर- **(१)**उमेदवार-.............................. **(२)** लेखनिक-..............................

**६.८** लेखनिकाची शैक्षणिक अर्हता :-`````````````````````````**६.९** उमेदवाराचे लेखनिकाशी नाते (असल्यास):-`````````````

**६.१०**लेखनिकाची आयोगामार्फत कोणत्याही पदावर निवड झाली आहे काय?होय/नाही

**६.११** लेखनिकाची आयोगामार्फत निवड झाली असल्यास:-

**(१)**परीक्षेचे नाव:-
**(२)**बैठक क्रमांक:-
**(३)**शिफ़ारस झालेले पद:-

**६.१२** लेखनिकाने यापूर्वी एखाद्या उमेदवाराला लेखनिक म्हणून मदत केली असल्यास:-

**(१)**उमेदवाराचे नाव:-
**(२)**परीक्षेचे नाव:-
**(३)**उमेदवाराचा बैठक क्रमांक:-

**७.**विकलांग उमेदवारांना लेखनिक पुरविण्यासंदर्भातील तसेच, आयोगाने दिलेल्या इतर सर्व सूचना वाचल्या असून त्याचे काटेकोरपणे
`````````````````````````````````````````````````````

पालन करण्याबाबत हमी देतो.

८.लेखनिकाची मदत घेण्याबाबत अथवा अनुग्रह वेळ घेण्याबाबत विहित निकषाची उमेदवारांकडून पुर्तता होत नाही अथवा उमेदवाराने स्वत: बद्दल तसेच लेखनिकाबद्दल दिलेली माहिती चुकीची / खोटी असल्याचे अथवा उमेदवारांकडून अथवा लेखनिकाकडून कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे कोणत्याही टप्प्यावर निदर्शनास आल्यास उमेदवाराची तसेच लेखनिकाची संबंधित परीक्षेची उमेदवारी रद्द करुन उमेदवारास व लेखनिकास आयोगाच्या स्वेच्छाधिकारानुसार प्रतिरोधित[Debar] करण्यात येईल, अथवा इतरही कायदेशीर कारवाई करण्यात येईल. अशा प्रकरणी संबंधितांची शासन सेवेतील पदावर नियुक्ती झाली असेल तर त्याची सेवा समाप्ती योग्य ठरेल, याची आम्हास जाणीव आहे.

उमेदवाराची स्वाक्षरी ......................................

दिनांक......................................

लेखनिकाची स्वाक्षरी..................................

दिनांक...................................

#लागू नसेल ते खोडावे

सोबत:-

(१)विकलांगत्वाबाबत विहित वैद्यकीय प्रमाणपत्र.

(२)लेखनिकाची सेवा घेणे आवश्यक असल्याबाबत/नियमानुसार अनुग्रह कालावधी आवश्यक असल्याबाबत सक्षम प्राधिका-याने सही व शिक्क्यासह प्रदान केलेल्या मूळ वैध प्रमाणपत्राची (प्रपत्र-२) छायांकित प्रत.

(३)लेखनिकाच्या आधारकार्डची/ओळखपत्राची उमेदवाराने व लेखनिकाने स्वसाक्षांकित केलेली प्रत.

प्रपत्र-२

**Certificate of Disability in Dominant (Writing) Extremity**
**(In case of Utilizing Services of scribe and/or Compensatory time)**

**NAME OF THE HOSPITAL:**_______________________________________________________________

| |
|---|
| Recent PP size attested photograph (Showing face only) of the person with disability. |

Certificate No.____________________Date:_________________________

This is to certify that we have carefully examined
Shri/Smt./Kum.______________________________________________________________ son /wife/ daughter of Shri_________________________________________________________________________
Date of Birth (DD / MM / YY) ___ ____ ____ Age_______years, male/female_________________________
Registration No._________________ Adress________________________________________________Village/ City ____________________Tq_______________________ District___________________, whose photograph is affixed above, and satisfied that :

(1) He/She is a person with disabilities suffering from:-
**Low Vision/Blindness/Locomotor Disability/Cerebral Palsy/Dyslexia**________________________

(2) In the light of above his/her overall permanent physical impairment/disability is.................percent (in word...............percent) in relation to his/her..........................(Part of Body) as per guidelines(To be specified)

(3) It is to certify that he/she is having disability due to which his/her **writing speed is affected permanently** and he/she needs a writer (Scribe)as permissible under Government of India rules governing the recruitment of Physically Challenged Persons.
#(4) It is to certify that he/she may be allowed writer[Scribe] during the course of examination.
#(5) It is to certify that he/she may be given Compensatory time of 20 minutes for every hour of examination.

2. The applicant has submitted the following document as proof of residence:-

| Nature of Document | Date of issue | Details of authority issuing certificate |
|---|---|---|
| | | |

(Signature and Seal of the Medical Authority)

| Dr________________ | Dr____________________ | Dr____________________ |
|---|---|---|
| President | Member Secretary | Concerned Specialist |

Signature/Thumb impression of the person in whose favour disability certificate is issued_____________

#Strike out which ever is not applicable.

महाराष्ट्र लोकसेवा आयोग

**विवरणपत्र-३**

(लेखनिकाची मदत घेणा-या उमेदवाराने लेखनिकासह द्यावयाचे **संयुक्त प्रमाणपत्र**)

**१.**परीक्षेचे नाव :-`````````````````````````````````````````````````` **२.** दिनांक :- / /२० **३.** वेळ:- ते

**४.**विषय :-`````````````````````````````````````````````````````````````````````````````

**५.**केंद्र :-``````````````````````````

**६.**उपकेंद्राचे नाव :- ```````````````````````````````````````````````````````````````````````````

| |
|---|
| लेखनिकाचा पासपोर्ट आकाराचा फोटो या ठिकाणी चिकटवावा. |

**उमेदवार व लेखनिकाची माहिती:-**

**१.**उमेदवाराचे नाव :-`````````````````````````````````````````````````````````````````````````````

**२.**उमेदवाराचा बैठक क्रमांक -..............................

**३.**लेखनिकाचे नाव -``````````````````````````````````````````````````````````````````````````````

**४.**लेखनिकाचा जन्मदिनांक - / /

**५.**लेखनिकाचे जन्मठिकाण:-``````````````````````````````````````````````

**६.**लेखनिकाचा कायम रहिवासाचा पत्ता -```````````````````````````````````````````````````````````
`````````````````````````````````````````````````````````````

**७.**लेखनिकाचा ओळखपत्र क्रमांक-..........................................
(आधार कार्ड, पॅन कार्ड, स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसन्स, मतदान ओळखपत्र, पासपोर्ट यापैकी एक)

**८.**लेखनिकाचा आधार क्रमांक...............................
(लेखनिकाच्या आधार कार्डची मूळ प्रत दाखविणे व स्वसाक्षांकित प्रत समवेक्षकांना देणे आवश्यक आहे.)

**९.**मोबाईल नंबर- (१)उमेदवार-.............................. (२)लेखनिक-...............................

**१०.**लेखनिकाची शैक्षणिक अर्हता :-``````````````````````````

**११.**उमेदवाराचे लेखनिकाचे नाते (असल्यास) :-``````````````````````````

**-: प्रमाणपत्र :-**

आम्ही निम्नस्वाक्षरीकार श्री/श्रीमती/कुमार/कुमारी `````````````````````````````````````````````````````````` (उमेदवाराचे नाव) या परीक्षेकरीता पात्र उमेदवार व श्री/श्रीमती/कुमार/कुमारी`````````````````````````````````````````````````````(लेखनिकाचे नाव) पात्र उमेदवाराचा लेखनिक, खालीलप्रमाणे प्रतिज्ञापत्र करतो की,

(**१**)आमच्या माहिती व समजुतीप्रमाणे वरील माहिती सत्य व बिनचूक आहे. विकलांग उमेदवारांना लेखनिक पुरविण्यासंदर्भातील तसेच, आयोगाने दिलेल्या इतर सर्व सूचना आम्ही वाचल्या असून त्याचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत हमी देतो.

(**२**)विकलांग उमेदवारांना लेखनिक पुरविण्यासंदर्भातील शासनाच्या तसेच आयोगाच्या नियम / सूचनानुसार **उमेदवाराला लेखनिकाची आवश्यकता आहे.**

(**३**)विहित विकलांगत्वाबाबत सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले वैध प्रमाणपत्र उमेदवाराकडे उपलब्ध असून ते कोणत्याही टप्प्यावरील चौकशीच्या वेळी सादर करण्यात येईल.

(**४**)**विकलांगत्वामुळे उमेदवार स्वत: उत्तरे लिहिण्यासाठी सक्षम नसल्याने** उत्तरे लिहिण्याच्या वेगावर मर्यादा येत असल्यामुळे परीक्षेच्या वेळी लेखनिकाची सेवा घेणे आवश्यक असल्याबाबत निवड प्रक्रिया अथवा मुलाखत अथवा निवडीनंतर कामावर रुजू होताना अथवा अन्य कोणत्याही टप्प्यावर सक्षम प्राधिका-याने नियुक्त केलेल्या वैद्यकीय मंडळाची खात्री पटविण्याची जबाबदारी उमेदवाराची आहे.

(**५**)लेखनिकाची मदत घेणारा उमेदवार नियमानुसार प्रत्येक तासाला २० मिनिटाचा अनुग्रह [Compensatory] वेळेसाठी पात्र आहे, याची आम्हाला जाणीव आहे.

(**६**)**उमेदवाराने लेखनिक नेमला असल्यास त्यास** दुस-या उमेदवाराला अन्य परीक्षेत लेखनिक म्हणून काम काम करता येणार नाही, याची आम्हाला/मला जाणीव आहे.

(**७**)उमेदवार व लेखनिक एकाच परीक्षेकरीता उमेदवार नाहीत.

(**८**)लेखनिकाची मदत घेण्याबाबत अथवा अनुग्रह वेळ घेण्याबाबत विहित निकषाची उमेदवारांकडून पुर्तता होत नाही अथवा उमेदवाराने स्वत: बद्दल तसेच लेखनिकाबद्दल दिलेली माहिती चुकीची / खोटी असल्याचे अथवा उमेदवारांकडून अथवा लेखनिकाकडून कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे कोणत्याही टप्प्यावर निदर्शनास आल्यास उमेदवाराची तसेच लेखनिकाची संबंधित परीक्षेची उमेदवारी रद्द करुन उमेदवारास व लेखनिकास आयोगाच्या स्वेच्छाधिकारानुसार आयोगामार्फत आयोजित केल्या जाणा-या परीक्षांमधून प्रतिरोधित[Debar] करण्यात येईल. अथवा इतरही कायदेशीर कारवाई करण्यात येईल. अशा प्रकरणी संबंधितांची शासन सेवेतील पदावर नियुक्ती झाली असेल तर त्याची सेवा समाप्ती योग्य ठरेल.

उमेदवाराची स्वाक्षरी ....................................... लेखनिकाची स्वाक्षरी...................................

दिनांक...................................... दिनांक...................................

(पर्यवेक्षक / समवेक्षक यांच्या उपस्थितीत दोघांनी स्वाक्षरी करणे आवश्यक)

समवेक्षकाची स्वाक्षरी................................... पर्यवेक्षकाची स्वाक्षरी.....................................
`````````````````````````````````````````````````````````````

महाराष्ट्र लोकसेवा आयोग

**विवरणपत्र-४**

(अनुग्रह कालावधीची [Compensatory Time] मागणी करणा-या उमेदवाराने द्यावयाचे प्रमाणपत्र)

१.परीक्षेचे नाव :-```````````````````````````````````````````` **२.**दिनांक :- / /२० **३.** वेळ:- ते

४.विषय :-`````````````````````````````````````````````````````````````````

५.केंद्र :-`````````````````````````

६.उपकेंद्राचे नाव :- `````````````````````````````````````````````````````````

**उमेदवाराची माहिती:-**

१.उमेदवाराचे नाव :-`````````````````````````````````````````````````````

२.उमेदवाराचा बैठक क्रमांक -..............................

३.मोबाईल नंबर-..........................................

**-: प्रमाणपत्र :-**

मी श्री/श्रीमती/कुमार/कुमारी ```````````````````````````````````````````````````` (उमेदवाराचे नाव) या परीक्षेकरीता पात्र उमेदवार खालीलप्रमाणे प्रतिज्ञापत्र करतो की,

(१)माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे वरील माहिती सत्य व बिनचूक आहे. विकलांग उमेदवारांना अनुग्रह कालावधी [Compensatory Time]पुरविण्यासंदर्भातील तसेच आयोगाने दिलेल्या इतर सर्व सूचना मी वाचल्या असून त्याचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत हमी देतो.

(२)विहित विकलांगत्वाबाबत सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले वैध प्रमाणपत्र उमेदवाराकडे उपलब्ध असून ते कोणत्याही टप्प्यावरील चौकशीच्या वेळी सादर करण्यात येईल.

**(३)विकलांगत्वामुळे उमेदवार स्वत: उत्तरे लिहिण्यासाठी सक्षम नसल्याने** उत्तरे लिहिण्याच्या वेगावर मर्यादा येत असल्यामुळे परीक्षेच्या वेळी अनुग्रह कालावधी आवश्यक असल्याबाबत निवड प्रक्रिया अथवा मुलाखत अथवा निवडीनंतर कामावर रुजू होताना अथवा अन्य कोणत्याही टप्प्यावर सक्षम प्राधिका-याने नियुक्त केलेल्या वैद्यकीय मंडळाची खात्री पटविण्याची जबाबदारी उमेदवाराची आहे.

(४)उमेदवार नियमानुसार प्रत्येक तासाला २० मिनिटाचा अनुग्रह वेळेसाठी [Compensatory Time] पात्र आहे, याची मला जाणीव आहे.

(५)अनुग्रह वेळ घेण्याबाबत विहित निकषाची उमेदवारांकडून पुर्तता होत नाही अथवा उमेदवाराने स्वत: बद्दल दिलेली माहिती चुकीची / खोटी असल्याचे अथवा उमेदवारांकडून कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे कोणत्याही टप्प्यावर निदर्शनास आल्यास परीक्षेची उमेदवारी रद्द करुन उमेदवारास आयोगाच्या स्वेच्छाधिकारानुसार आयोगामार्फत आयोजित केल्या जाणा-या परीक्षांमधून प्रतिरोधित [Debar] करण्यात येईल. अथवा इतरही कायदेशीर कारवाई करण्यात येईल. अशा प्रकरणी उमेदवाराची शासन सेवेतील पदावर नियुक्ती झाली असेल तर त्याची सेवा समाप्ती योग्य ठरेल,याची मला जाणीव आहे.

उमेदवाराची स्वाक्षरी .........................

दिनांक.........................

(पर्यवेक्षक/समवेक्षक यांच्या उपस्थितीत स्वाक्षरी करणे आवश्यक)

समवेक्षकाची स्वाक्षरी.................................... पर्यवेक्षकाची स्वाक्षरी ....................................